वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य
पहिला मजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
फोन- ०२०- २६१३००५४, Email- vslnapune22@gmail.com

जा.क्र./PMKSY-WDC २.०/अमृत सरोवर मा.सु./ ४७३/२०२५ दिनांक - ७.०५.२०२५

प्रति,
१. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र,
(सर्व)
२. प्रकल्प व्यवस्थापक,
पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र,
तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी,
(सर्व)

**विषय - प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत अमृत सरोवर बाबीच्या मार्गदर्शक सूचनांबाबत...**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० नैसर्गिक संसाधने व्यवस्थापन आणि नियमन (Natural Resources Management and Governance Plans) अंतर्गत प्रत्येक पाणलोट प्रकल्पात किमान एक अमृत सरोवर निर्माण करण्यात यावे अशा सूचना दि. २४/४/२०२५ रोजीच्या मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील सर्व जिल्हाधिकारी यांच्या आढावा बैठकीमध्ये निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार अमृत सरोवर बाबतच्या मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

## अमृत सरोवर मार्गदर्शक सूचना

**पार्श्वभूमी -**

पाणी ही सर्वात महत्त्वाची नैसर्गिक संपत्ती आहे. संपूर्ण मानव जातीला निसर्गाने दिलेली ही अमूल्य देणगी आहे. पृथ्वीचा दोन तृतीयांश भाग पाण्याने व्यापलेला आहे, पण उपलब्ध पाण्यापैकी केवळ दोन ते तीन टक्केच पाणी वापरण्यायोग्य आहे. आज राज्यात अनेक भागात

भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यावर मात करण्यासाठी अमृत सरोवर बांधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

अमृत सरोवर जमिनीवर आणि जमिनीखाली पाण्याची उपलब्धता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. अमृत सरोवर शाश्वत आणि दीर्घकालीन उत्पादक मालमत्ता तयार करते, तसेच संवेदनशील सजीव प्राणी आणि पर्यावरण या दोघांनाही फायदेशीर आहे.

**उद्दिष्ट –**

प्रत्येक पाणलोट प्रकल्पात किमान एक अमृत सरोवर (तलाव) बांधणे/ विकसित करणेचे उद्धिष्ट आहे. प्रत्येक अमृत सरोवराचे पाणलोट क्षेत्र किमान १ एकर (०.४ हेक्टर) असेल आणि पाणी धारण क्षमता सुमारे १०,००० घनमीटर असेल.

**अंमलबजावणी कार्यपद्धती –**

- किमान तलाव क्षेत्र (Minimum Pondage area) १ एकर (०.४ हेक्टर)
- सुमारे १० हजार घनमीटर पाणी धारण क्षमता असलेले हे अमृतसरोवर किमान १ एकर जागेवर बांधण्यात येणार यावे.

**क्षेत्र निवड (स्थळ निश्चिती ) –**

अमृत सरोवरांचा लाभ अधिकाधिक मिळावा आणि त्याची अंमलबजावणी अत्यंत विश्वासार्ह पद्धतीने व्हावी, यासाठी खालील बाबी विचारात घेऊन क्षेत्र निवड करावी.

- अमृत सरोवर निर्माण करण्यासाठी शासकीय जागा (ई – वर्ग जमीन) असणे आवश्यक आहे.
- जमिनीची उपलब्धता – पडीक जमीन
- अपधावद्वारे पावसाच्या पाण्याची उपलब्धता
- भौगोलिक स्थिती – उताराची, सखल भाग असलेली (प्राधान्य)
- मातीची खोली – माती पुरेशी खोल असावी.
- मातीचा प्रकार – क्षारयुक्त नसावी, अल्कलीयुक्त तसेच आम्लयुक्त नसावी.
- भू-रचना – त्या ठिकाणी भेगा / इतर दोष नसावा.
- रहिवासी भागापासूनचे अंतर आणि पायाभूत सुविधांची कामे इत्यादि बाबी लक्षात घ्याव्यात.
- वनक्षेत्रात असलेल्या अमृत सरोवराच्या जागेबाबत संबंधित वन विभागाच्या परवानगीनंतर बांधले जाऊ शकेल. वनक्षेत्रात अमृत सरोवर, एकतर वनविभाग स्वत: बांधू शकतो किंवा

तशी व्यवस्था शक्य नसल्यास जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना हे काम सोपवले जाऊ शकते. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना वन विभागाने तसे ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.

- प्रत्येक अमृत सरोवर स्थळ निश्चिती करताना जलसंधारण विभागाचे संबंधीत जिल्ह्याचे अभियंता यांनी पाणलोट क्षेत्र, नाला इत्यादींना भेट देऊन अमृत सरोवर क्षेत्राची तांत्रिक आणि प्रशासकीय व्यवहार्यता तपासावी.

**अंदाजपत्रक तयार करणे / तांत्रिक मान्यता / प्रशासकीय मान्यता –**

- अमृत सरोवराकरिता क्षेत्र (स्थळ) निश्चित झाल्यानंतर पाणलोट समितीची मान्यता घ्यावी.
- स्थानिक भूस्तर व आकारमानानुसार अमृत सरोवराचे अंदाजपत्रक तयार करावे.
- अंदाज पत्रकाचा नमुना खालीलप्रमाणे.

| अ.क्र | बाबीचा तपशील | एकक Unit | परिमाण | दर रु./ एकक | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मातीचे खोदकाम | | | | |
| | पहिला टप्पा (३ फूट खोली) (लांबी ७५ मी. X रुंदी ६० मी. X उंची ०.९१५ मी.) सामाईक दरसूची बाब क्र. १ अ | घ. मी. | 4117 | 37.8 | 155623 |
| | दुसरा टप्पा (३ फूट खोली) (लांबी ७३.१७ मी. X रुंदी ५७.१७ मी. X उंची ०.९१५ मी.) सामाईक दरसूची बाब क्र. २ अ | घ. मी. | 3895 | 48.9 | 190466 |
| | तिसरा टप्पा (३ फूट खोली) (लांबी ७१.३४ मी. X रुंदी ५६.३४ मी. X उंची ०.९१५ मी.) सामाईक दरसूची बाब क्र. ३ अ | घ. मी. | 3678 | 63.6 | 233921 |
| | | एकूण | 11690 | | 580009 |
| २ | मातीचा बांध तयार करणे | घ. मी. | 2000 | 76.4 | 300000 |
| ३ | माती बांधाचे संघटन (धुमसणे) Compaction | चौ. मी. | 1500 | 10.55 | 37500 |
| ४ | उतारावर दगडी पिचिंग | चौ. मी. | 1000 | 172.53 | 150000 |
| ५ | बांधावर गवत लागवड करणे (turfing) | चौ. मी. | 1000 | 50 | 50000 |
| ६ | इनलेट आणि आउटलेट (पाईप / हेडवॉलसह) | एक रकमी | 1 | 75000 | 75000 |
| ७ | सरोवरा भोवती वृक्षारोपण | संख्या | 100 | 100 | 10000 |
| ८ | कांटेरी तारेचे कुंपण | लांबा मी | 200 | 300 | 60000 |
| ९ | फलक (योजनेच्या नावाचा) | संख्या | 1 | 10000 | 10000 |
| १० | आकस्मिक खर्च (३%) | | | | 38175 |
| | एकूण | | | | 1890693 |

- मृद व जलसंधारण विभागाची सामाईक दरसूची व मग्रारोहयोची दरसूची मधील बाबनिहाय दर वापरून वरील प्रमाणे अंदाज पत्रक तयार करण्यात यावे.

- अमृत सरोवर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० यांनी द्यावी.
- तांत्रिक मान्यता दिल्यानंतर जिल्हास्तरीय पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) च्या मान्यतेने प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कडे पाठवावा. प्रस्तावासोबत अमृत सरोवर अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता आदेश, जिल्हास्तरीय समिती (WCDC) मान्यतेचे पत्र किंवा इतिवृत्त, अमृत सरोवर स्थळाचा अक्षांश रेखांश सह छायाचित्र (Photograph) इ जोडणे आवश्यक आहे.
- प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविणे, कार्यारंभ आदेश देणे, प्रत्यक्ष कामकरून घेणे, निधी मागणी करणे, मापन पुस्तकात नोंद घेणे, देयक अदा करणे व इतर आवश्यक अनुषंगिक कार्यवाही जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० यांनी करावी.

**तपासणी –**

काम पूर्ण झालेल्या अमृत सरोवरांची तांत्रिक तपासणी जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० यांनी करावी.

**अहवाल सादर करणे** –

या बाबींचा मासिक प्रकल्प अहवाल वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यालय, पुणे यांना खालील प्रपत्रात सादर करावा.

| अ. क्र. | जिल्हा | गावाचे नाव | पाणलोट प्रकल्प क्रमांक | अमृत सरोवर संख्या | झालेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

आर्थिक तरतूद -

अमृत सरोवर या घटकाकरिता प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० नैसर्गिक संसाधने व्यवस्थापन आणि नियमन (Natural Resources Management and Governance Plans) अंतर्गत राज्यस्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वरील मार्गदर्शक सूचनाप्रमाणे प्रत्येक पाणलोट प्रकल्पात किमान एक अमृत सरोवर निर्माण करण्याची कार्यवाही जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० यांनी करावी.

(प्रकाश खपले) भा.प्र.से.
आयुक्त, मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र राज्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,

प्रत-
प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (सर्व)
प्रतिलिपी- मा. सचिव, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.